# मूलतत्ववाद : संकल्पना आणि वास्तव

**डॉ. अनिल रा. कडू,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, स्व.पुंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालय, वरुड

---

**प्रस्तावना :** मूलतत्वावादाची एका वाक्यात स्पष्ट करायची तर असे म्हणता येईल की धर्माप्रती अत्याधिक वचनबध्दता 'Close commitment to religion is called fundamentalism' मूलतत्ववादी मग ते कोणत्याही धर्माचे असोत त्या धर्माची एकच शिकवण असते ती म्हणजे धर्मावर निर्विवाद श्रध्दा अर्पण करा. मात्र काही मूलतत्वद्यांनी या संकल्पनेला राजकीय सत्ता प्राप्तीचे अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. उदा. आयातुला खोमेनी यांनी इस्लामला राजकीय स्वरुप देण्याचा खटाटोप करुन त्याच्या जागतिक स्वरुपाची कल्पना मांडली तर काही देशांतील मूलतत्ववादी त्यांचे संबंध अतिरेकी धर्मसत्तेशी जोडतात.

मूलतत्ववाद व्यक्तिला धर्मासाठी बलिदान करण्याची शिकवण देतो व त्यातूनच मूलतत्वारील अंध:विश्वास माणसाला विनाशाकडे नेतो.

मूलतत्ववादाची संकल्पना केवळ एकेश्वरवादाची शिकवण देते. मूलतत्ववादाचे असे आग्रही प्रतिपादन असते की जगात भविष्यकाळात केवळ एका विशिष्ट धर्माचेच अस्तित्व राहणार आहे. म्हणूनच मूलतत्ववाद अन्य धर्मीयांना धर्म स्वातंत्र्य अमान्य करतो आणि त्यांच्या अस्तित्वाचा विरोध करतो.

अशा धर्म पिसाट (Religious fanatic) आणि सनातनी विचारातूनच विरोधी धर्मीयांचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी हिंसक मार्गाची शिकवण देतो. मूलतत्ववाद अन्य धर्माच्या देवदेवता आणि त्यांचा नामोच्चारही खपवून घेत नाही. उदा. इस्लामच्या मूलतत्वांप्रमाणे अल्लाह ही एकच सर्वोच शक्ती किंवा जगातील एकमेव वास्तव (Reality) आहे. तर ख्रिश्चन मूलतत्ववादी म्हणतात की, अल्लाह नव्हे तर येशू हाच अखिल मानवांचा दैवत आहे. त्याच बरोबर ते अन्य धर्मीयांच्या देवतांना सैतान किंवा डेव्हिल मानतात. प्रसंगी तलवारीच्या जोरावर किंवा आर्थिक प्रलोभने दाखवून सक्तीने धर्मांतर करण्यावर भर देतात.

मूलतत्ववादाची संकल्पना केवह एकाच राजयापुरती नसून तिचे स्वरुप विश्वव्यापी आहे. काही महत्वपूर्ण राज्यात मूलतत्ववादाची पाळमुळ कशी रुजली त्यांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे देता येईल.

**१. इस्लामिक मूलतत्ववाद :** इराण सौदी अरेबिया व एकूण अरब जगातात या संकल्पनेचा प्रारंभ झाला. इस्लामी राज्यात मूलतत्ववादाने पकड का घेतली त्याची विविध कारणे आढळतात. उदा. भांडवलवाद इस्लामिक राज्यातील जनतेचे मुलभूत प्रश्न सोडवू शकला नाही. त्याचबरोबर डाव्या पक्षांचा इस्लामि राष्ट्रात झालेला पराभव व नंतर त्यांनी धर्माशक्तींची केलेली हातमिळवणी हे देखील महत्वाचे कारण ठरते. अतिरेकी धर्मावादाला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात आलेले अपयश अशा अनेक कारणांमुळे तिथे मूलतत्ववादांचा प्रभाव पडला.

इस्लामिक मूलतत्ववाद तिथे अत्यंत शक्तीशाली राजकीयवाद म्हणून उदयास आला. इस्लामिक मूलतत्ववाद त्यांच्या जन्मापासूनच एक राजकीय, सैनिकी आणि धार्मिक अधिष्ठानावर आधारित संकल्पना म्हणून पुढे आली.

मूलतत्ववादाचे प्रतिपादन असे की विद्यामान जगातील राष्ट्रराज्य व्यवस्थेत परिवर्तन करुन तिचे रुपांतर एका जागतिक इस्लामी राज्य व्यवस्थेत व्हावे.[१]

मात्र हया मूलतत्ववादामध्येही अंतर्गत व्दंव्द आढळते. ८५ टक्के सुन्नी पंथी तर १५ टक्के सिया पंथाचे इस्लाम समर्थक आढळतात. खोमेनी यांनी 'Pan Islamis' ची कल्पना मांडली. त्यासाठी कुराण या पवित्र ग्रंथाचा दाखला दिला. यातून एक धर्मपिसाट लढाऊ मूलतत्ववादाने जन्म घेतला. त्याच्या प्रचार प्रसारासाठी बंडखोरी रक्तपात, जेहाद (धर्मयुध्द) अशा हिंसक मार्गांचा अवलंब केला.

यातूनच पुढे दहशतवादाचा मुखवटा पुढे आला. एकूण या मूलतत्ववादातून मानव संहाराचे तत्वज्ञान जगापुढे आले.

**२. पाकिस्तानातील मूलतत्ववाद :** पाकिस्तान या राष्ट्राचा उदय मूलत: व्दिराष्ट्रवादातून झाला. इस्लामिक मूलतत्ववादापासून पाकिस्तानला सतत प्रेरणा मिळत गेली. या मूलतत्ववादाचे मुख्य

लक्ष काश्मीरची प्राप्ती व भारत विरोध हेच आढळून येते. अफगाणमधील तालिबानी व त्यांच्या पुढाऱ्यांसाठी पाकिस्तन ही सुरक्षित भूमी ठरली.

परंतु तालिबानी पाक सरहद्दीत घुसून जेव्हा मुस्लिमांच्या जिवित आणि संपत्तीचाच दिनाश करु लागते त्यामुळे त्या राष्ट्रापुढे स्वअस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला.

प्रश्न दहशतवाद्यांना आश्रय देण्याचा असो किंवा त्यांना शस्त्रपुरविण्याचा असो त्यामागे पाकिस्तानचे प्रमुख लक्ष भारत विरोध हेच राहिले आहे. पाकिस्तानचे दुटप्पी धोरण लक्षात येताच अमेरिकेने तिथे गुप्तपणे घुसून लादेनचा नायनाट केला. एकूण पाकिस्तानातील धर्मांध मूलतत्ववादाचे विश्लेषण केल्यास तेथील मूलतत्ववाद ही भारत विरोध एक प्रतिक्रियावादी चळवळ आहे असे आढळून येते.

**३. ख्रिश्चन मूलतत्ववाद :**ख्रिश्चन मूलतत्ववादाचे अधिष्ठान देखील धर्माचे जागतिक प्राबल्य स्थापित करणे असेच आढळून येते. धर्मपिसाट मूलतत्ववादाचे पडसाद अमेरिकेसारख्या प्रगत देशातही पडलेले दिसतात. सर्वांचे ख्रिश्चन धर्मात धर्मांतर करुन घेतल्याशिवाय यशू पृथ्वीवर येणार नाही. या विचारात कट्टर मूल तत्ववाद आढळतो. अमेरिकेत ख्रिश्चन धर्मातील दोन पंथात अंतर्विरोध जाणवतो. तेथील प्रोटेस्टंट ख्रिश्चन धर्मवाद्यांनी बायबलमधील मूलतत्वांचा शब्दशः अर्थ लावण्यांवर भर दिला आहे. त्यांनी लढाऊ धर्मवादाचा वापर करुन तेथील आधुनिक धर्मनिरपेक्ष संस्कृतीलाच विरोध केलेला आहे.[२] अमेरिकेतही मूलतत्ववादाचे धार्मिक अतिरेकी वादात रुपांतर झालेले दिसते. सनातन प्रोटेस्टंट ख्रिश्चनवाद्यांनी सुधारणावादी आणि धर्मनिरपेक्ष्ज्ञ भुमिकेचा विरोध केलेला आढळतो. त्यांच्या मते धर्मनिरपेक्षवाद 'उदारमतवाद' या संकल्पना येशूच्या इच्छेविरुध्द आहेत.

**४. हिंदूमूलतत्ववाद :** एकेकाळी हिंदूचे साम्राज्य अफगाण, मध्यआशिया ते तिबेट, कबोडिया, उत्तर व्हिएटनाम ते जावा पर्यंतच्या प्रदेशात पसरले होते. परंतु विविध कारणांनी त्यांचे पतन झाले. एकोणविसाव्या शतकात आर्यसमाजाव्दारे स्वामी दयानंद सरस्वती यांनी नवहिंदूत्ववाद मांडला. तर राजा राममोहन रॉय यांनी ब्रम्होसमाजाव्दारे सतीसारखा कुप्रयेविरुध्द जनजागृती करुन तसे कायदे सम्मत करवून घेतले.

विसाव्या शतकात लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या सार्वजनिक उपक्रमातून राष्ट्रीय आंदोलनात चैतन्य निर्माण करण्याचे प्रयत्न केले. अर्टिक होम ऑफ वेदाज या ग्रंथातून वेदांचा इतिहास ८००० हजार वर्षापुर्वीचा आहे असे विचार मांडले. मनुस्मृति प्रमाणे अस्पश्यता पाळणे किंवा जाती व्यवस्था पाळणे हे धर्मकृत्य आहे. हे विचार मूलतत्ववादाला पोषक ठरतात. [३]

डेव्हिड फ्राल या लेखकाने आपल्या 'Hindu Fundamentalism' या पुस्तकातून हिंदू मूलतत्ववादाच्या संकल्पनेचा अन्वयार्थ सादर केला आहे. यांस 'हिंदुमुलतत्ववाद' असे म्हणता येईल काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. हा युक्तीवाद राज्यशास्त्रातील विचारवंतांनी आणि धर्मनिरपेक्षतावाद्यांनी जरुर तपासून पाहावा. उदा. मूलतत्ववादी केवळ एकेश्वरवादाची संकल्पना मांडतात. मात्र हिंदू धर्मात अनेकेश्वरवादाचा पुरस्कार केला जातो.

ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्मतत्ववादी जगात अंतिमतः केवळ एकाच धर्माचे अस्तित्व राहणार व अन्य धर्मीयांना सहन केले जाणार नाही हे गृहीतक तपासून मग हिंदूमूलतत्ववाद अशी काही संकल्पना आहे का याचा शोध राज्यशास्त्राच्या अीयासकांनी घ्यायचा आहे.इस्लाम किंवा ख्रिश्चन मूलतत्ववादात अन्य धर्मीयांना धर्मस्वातंत्र्य ही कल्पनाच मुळात अमान्य कली जाते. हिंदू धर्माच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास अशी टोकाची भूमिका घेतल्याची नोंद आढळत नाही.[४]

हिंदू धर्मवाद्यांचा विश्वास अनेकेश्वरवादावर आहे. यात शिव, विष्णू, आदिशक्ती व अगदी अलिकडच्या काळात स्वामीनारायण पंथ रामकृष्ण मिशनची तत्वेदेखील स्विकारुन त्यांचा आदर केला जातो. अन्य धर्माचा आदर करु नका असे कुठेही लिहिलेले आढळत नाही.हिंदू धर्मात वेद, गीता रामायण यांना तर आदराचे स्थान आहेच परंतु याचबरोबर कुराण किंवा बायबल ग्रंथाबद्दल दुराग्रह दिसत नाही. या विभिन्न मूलतत्ववादांमध्ये हा महत्वाचा फरक आढळतो.

धर्मप्रचारासाठी चळवळी उभ्या करुन सक्तीने धर्मपरिर्वतन घडवून आणण्यात आल्याचे दाखले मिळतात. परंतु हिंदू धर्मवाद्यांनी अशा चळवळी उभ्या केल्या का याचा शोध त्याचे

विश्लेषण करावे लागेल.[५] अन्य धर्मीय पुस्तके व साहित्यावर हिंदूधर्मवाद्यांनी बंदी घातल्याचे वाचनात नाही म्हणूनच हिंदू धर्मवादास मूलतत्ववादाची तत्वे कितपत लागू पडतात हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

विविध मूलतत्ववाद्यांच्या दृष्टीकोनातून महिलांचे हक्क आणि अभिव्यक्ती स्वंञ्याबद्दल विरोधीमत प्रदर्शित केलेले दिसते. इस्लाम मूलतत्ववाद्यांनी महिलांना सार्वजनिक जागी जाण्यास बंदी घातलेली दिसते. कारण त्यांना अन्य धर्मीयांकडून धोका संभवतो असे प्रतिपादन करण्यात आलेले आहे. या धर्मात पुरुषांबरोबर स्त्रियांना नमाज पढता येत नाही. मुस्लिम समाजात स्त्रियांचे स्थान हे एक स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरु शकतो.

**निष्कर्ष** : भारतात शहाबानु खटल्याच्या निकालानंतर झालेल्या घटनादुरुस्त्याबाबत धर्मनिरपेक्षशक्ती आणि पुरातनवादी मुस्लिम संघटनांनी व्यक्त केलेली मते मूलतत्ववादास पोषक ठरतात. इस्लामी मूलतत्ववाद्यांचे समाधान करुन सत्ताधाऱ्यांनी आपल्या व्होट बॅंक जपल्या अशा प्रतीक्रिया उमटलेल्या दिसतात.[६]

शहाबानु खटल्यांनतर उत्तर भारतात या राजपूत तरुणीने कायदा भंग केला आणि ती सती गेली. मात्र पुमराणमतवादी हिंद गटाने या घटनेचे समर्थन करणे म्हणजे मूलतत्ववाद जपण्यासारखेच आहे. हे समर्थन हिंदू समाजाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे आहे. तव्दवतच सानिया मिर्झाने टेनिससाठी कमी कपडे घातले म्हणून तिच्या विरुध्द इस्समी मूलतत्ववाद्यांनी फतवा काढणे किंवा तस्लिमा नसरीनने मुस्लिम महिलांच्या प्रश्नांवर आवाज उठविला तर तिला ठार माण्याची धमकी देणे व तिच्यावर हैदराबादमध्ये खुनी हल्ले करणे हे प्रकार मूलतत्ववाद जोपसण्याचेच प्रतिक ठरतात.

उत्तर प्रदेशात इमरान नावाच्या मुलीवर तिच्या सासऱ्यानेच बलात्कार केला तर इस्लामी न्यायपंचायतीने शरियत कायद्यानुसार सासऱ्यालाच नवारा मानून नवऱ्यास मुलाप्रमाणे वागविण्याचा निर्णय देणे हे मूलतत्ववादाला खतपाणी देणेच ठरते. या निर्णयाचा भरतील धर्मनिरपेक्ष शक्तींनी कितपत विरोध केला असा माझा प्रश्न आहे.फ्रीप्रेस जर्नलच्या २१ डिसेंबर २००५ च्या अंकात प्रसिध्द झालेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेशांत बीएसपी पक्षाच्या मुस्लिम कार्यकर्त्यांनी 'जयभीम' घोषणेला विरोध केला कारण काय तर त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अल्लाह इतकाच मान दिल्यासारखे होईल. या घटना प्रमाणिकपणे धर्मनिरपेक्षता जोपासण्याऱ्या विचारवंतांना यातना देणाऱ्या ठरतात. डिसेंबर २०१२ मधील दिल्लीला घडलेली महिलेवरील बलात्काराच्या घटनेचा आपण सर्वांनीच निषेध केला पहिजे.

मूलतत्ववादाचे अतिरेकी किंवा सैनिकी स्वरुप धर्मनिरपेक्ष भारतीय समाजास परवडणारे नाही. भारताचे वैशिष्टय असे की इथे विविध धर्मप्रवृत्ती एकत्र नांदत आहेत. वरील अनेक घटना येथील ऐक्यास हादरा देणाऱ्या ठरला आहेत. बहुविध धर्मांचे अस्तित्व असलेल्या आपल्या देशात देश समर्थपणे चालविण्यास मूलतत्ववाद नव्हे तर धर्मनिरपेक्ष तत्वांची इमानदारीने अंमलबजावणी करणे हाच अतिरेकी मूलतत्ववादाचा उत्तम उपाय ठरतो. धर्मउपासना ही वैयक्तिक बाब आहे. तिचे सामाजीकरण होऊ नये. भारत एकसंघ राहावा — धर्मनिरपेक्ष राहावा. त्यासाठी राज्यघटना म्हणजेच वेद कुराण आणि बायबल अशी मानसिकता निर्माण होण्यावरच धर्मनिरपेक्ष भारताची संकल्पना साकार होणार आहे.

- **संदर्भ** :

1. John. S. Hawley 'Fundamentalism and Gender' Oxford University press, 1994.
2. Verma S. L., 'Advance Modern Politic Theory' Rawat Publication Mumbai, 2008.
3. दरेकर समीर, 'धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेलाच सुसंग' अभिनव निर्माण प्रकाशन, पुणे २००८.
4. Devid Frawley 'Hindu' Fundamentalism : What it is' http:/www.hindu books.org
5. Farooq Sulehria 'Islamic Fundamentalism in Pakistan' (Source: Internet Information Service.)
6. Raipurkar, Dr. Vasant, 'Challenges of International Terrorism', Article in vichar Vedh, SHri. Mangesh Prakashan, 2007.